**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ८६/२०१९** | **दिनांक २५/१०/२०१९** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,** विभाग प्रमुख, कृषिविदया विभाग ९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,** नोडल ऑफिसर, कृषिविदया विभाग ९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,** तांत्रिक अधिकारी कृषिविदया विभाग ८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १९/१०/२०१९ ते २५/१०/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २६/१०/२०१९ सकाळी ८:३० पासून ३०/१०/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९/१० | २०/१० | २१/१० | २२/१० | २३/१० | २४/१० | २५/१० | | २६/१० | २७/१० | २८/१० | २९/१० | ३०/१० |
| ४.८ | ४७.२ | ११.२ | १३.६ | १४.० | ०.० | ९.६ | पाऊस (मिमी) | ४५ | २ | ० | १२ | १० |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | २९ | ३० | ३१ | ३२ | ३३ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से) | २४ | २४ | २३ | २४ | २५ |
| - | - | - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | ८ | ८ | ७ | ४ | ७ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ९० | ८८ | ९० | ९२ | ८७ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ८३ | ८१ | ६६ | ६७ | ६४ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १२ | ९ | ६ | ४ | ८ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | पू. | पु. | पू. | इ.पु. | इ.पु. |

| | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ९५.६ | ५२१७.७ | ३५५८.३ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक २६ ऑक्टोबर, २०१९ रोजी तुरळक ठिकाणी मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून किनारपट्टी भागात वाऱ्याचा वेग तशी ५५ ते ६५ कि.मी. प्रती तास राहील तसेच आकाश मेघाच्छादित राहील.**

**दिनांक २५ ते ३१ ऑक्टोबर, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील. सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार रायगड जिल्हयामध्ये वनस्पती निर्देशांक मध्यम स्वरूपाचा आणि प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार मध्यम ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **पक्व अवस्था** | • दिनांक २६ रोजी जोरदार पाऊसाची शक्यता असल्याने तयार भात पिकाची कापणी पुढे ढकलावी व दिनांक २७ पासून पाऊसाचा अंदाज घेवून तयार झालेल्या भात पिकाची **सकाळच्या वेळेस** जमिनीलगत कापणी व मळणी करून भात सुरक्षित ठिकाणी सुकण्यासाठी पसरून ठेवावे. |
| **वाल** | **-** | • खरीप भात कापणीनंतर अंग ओलाव्यावर घेण्यात येणाऱ्या वाल पिकाची पेरणी जमीन वाफसा स्थितीत आल्यानंतर करावी. |
| **आंबा** | **पालवी** | • ढगाळ व दमट वातावरणामुळे, आंब्याच्या नवीन पालवीवर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी १ टक्का बोर्डोमिश्रण किंवा ०.१ टक्का कार्बेन्डाझीम १० ग्रॅम प्रती १० लि. पाण्यात मिसळून फवारावे.<br>• दिनांक २६ व २७ रोजी वाऱ्याचा वेगात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या कलमांना काठीचा आधार द्यावा.<br>• ढगाळ व दमट वातावरणामुळे, आंब्याच्या नवीन येणाऱ्या पालवीवर तुडतुडे, शेंडे पोखरणारी आणि मिजमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाऊसाची उघडीप पाहून फवारणी करावी. |
| **काजू** | **पालवी** | • दिनांक २६ व २७ रोजी वाऱ्याचा वेगात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या कलमांना काठीचा आधार द्यावा.<br>• ढगाळ व दमट वातावरणामुळे, काजूच्या नवीन येणाऱ्या पालवीवर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी नवीन पालवी फुटण्याच्या वेळी मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही १५ मि.ली. किंवा लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाऊसाची उघडीप असताना फवारणी करावी. |
| **नारळ** | **फळधारणा** | • दिनांक २६ रोजी वाऱ्याचा वेगात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांना काठीचा आधार दयावा. |

• **टिप :** फवारणी पाऊसाची उघडीप असताना करावी.

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोलीयेथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**